शासन निर्णय क्रमांक :- एसएससी-२०१२/(१५४/१२)/उमाशि-२

दिनांक :- २१ एप्रिल, २०१५ सोबतचे

## परिशिष्ट "अ"

(१) भारतीय शालेय खेळ महासंघ, भारतीय क्रीडा प्राधिकरण पुरस्कृत खेळ, महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत आयोजित सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप, जवाहरलाल नेहरू हॉकी कप, विनु मंकड, सी.के. नायडू केंद्र शासन मान्यताप्राप्त खेळ, भारतीय ऑलिंपिक व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशनची संलग्नता असलेले एकविध खेळाच्या राज्य संघटनाहस्त आयोजित खेळ क्रीडा गुणासाठी ग्राह्य धरण्यात यावे.

(२) इ. १० वी व १२ वी च्या खेळाडू विद्यार्थ्यांसाठी राज्य, राष्ट्रीयव आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांचा १ जून ते २८/२९ फेब्रुवारी हा कालावधी ग्राह्य धरण्यात यावा. परीक्षा संपल्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या कोणत्याही क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना वाढीव क्रीडा गुणांची सवलत देण्यात येऊ नये.

(३) खेळाडू विद्यार्थी हा एकापेक्षा अधिक खेळात सहभागी झालेला असला तरीही त्याला त्याच्या उच्चतम एकाच खेळाच्या प्रमाणपत्राचे गुण ग्राह्य धरण्यात यावेत.

(४) खेळाडू विद्यार्थी ज्या जिल्ह्यामध्ये शिक्षण घेत आहे त्याच जिल्ह्याकडून त्याने राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतलेला असावा. (ही अट मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे जिल्ह्यातील खेळाडू विद्यार्थ्यांच्या बाबतीत लागू होणार नाही.)

(५) एकविध खेळ क्रीडा संघटनानी १४ वर्षावरील कोणत्याही २ वयोगटातच राज्य/राष्ट्रीय स्तरीय क्रीडा स्पर्धा आयोजित केलेल्या असाव्यात. (इ. १० वी व १२ वी साठी) खुल्या गटातील क्रीडा स्पर्धा वाढीव क्रीडा गुणासाठी ग्राह्य धरण्यात येऊ नयेत.

(६) शालेय, राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या व प्रावीण्यप्राप्त खेळाडूंची यादी स्पर्धा संपल्यानंतर १५ दिवसांच्या आत ज्या जिल्ह्यात क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे, त्या जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्याबाबतची कार्यवाही करावी. सदर यादी वेबसाईटवर प्रसिद्ध करण्याबाबत क्रीडा उपसंचालक (मुख्यालय) यांनी नियंत्रण ठेवावे.

(७) अधिकृत राज्यसंघटनांनी आयोजित केलेल्या अधिकृत राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या व प्राविण्य प्राप्त खेळाडूंची यादी त्या त्या खेळाच्या राज्यसंघटनेने त्यांच्या अध्यक्ष/सचिव यांच्या स्वाक्षरीने १५ दिवसांच्या आत राज्यसंघटनेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करावी व एक प्रत क्रीडा संचालनालयास सादर करावी.

(८) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने ज्या खेळाडूंना वाढीव क्रीडा गुण दिलेले आहेत त्यांची यादी वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात यावी.

(९) राज्य संघटनांनी त्यांच्या राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेची माहिती स्पर्धा संपन्न झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत विहित नमुन्यामध्ये संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयास दोन प्रतीत व एक प्रत क्रीडा व युवक सेवा संचालनालयास सादर करावी. जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी सदर प्रस्तावाची छाननी करुन पुढील कार्यवाही करावी. यानंतरचे प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत [illegible] (एकविध खेळाच्या राज्य/जिल्हा संघटनेने संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी

कार्यालयांना सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी सोबतच्या परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आलेली आहे.

(१०) राज्यस्तरीय स्पर्धा संपन्न झाल्यानंतर खेळाडूने त्याचे अर्ज त्वरीत मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्याकडे सादर करावा. मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी खेळाच्या अर्जाची शहानिशा करुन तो ७ दिवसात संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे सादर करावा. जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी क्रीडा गुणांचे प्रस्ताव त्या शैक्षणिक वर्षातील दिनांक ३० एप्रिल पर्यंत संबंधित विभागीय शिक्षण मंडळ यांच्या कार्यालयास सादर करावेत.

(११) राज्य संघटनेमार्फत आयोजित स्पर्धा या जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीय स्तरावर आयोजन करणे आवश्यक आहे.

(१२) संघटनेच्या जिल्हास्तरीय व विभागीय क्रीडा स्पर्धेची व जिल्हास्तरिय संघटनेच्या अधिकृततेबाबतच्या कागदपत्रांची तपासणी जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी करावी.

(१३) क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत ज्या खेळांना क्रीडा गुण द्यावयाचे आहेत त्या खेळांच्या अधिकृत राज्य संघटनांच्या याद्या जिल्हा क्रीडा अधिकारी व विभागीय मंडळांना दिनांक १ मे पर्यंत कळवाव्यात. तसेच आपल्या वेबसाईटवर प्रसिध्दिस द्याव्यात. (एकविध खेळाची अधिकृत राज्य संघटना ठरविण्यासाठी राज्य संघटनांनी क्रीडा व युवक सेवा संचालनालयास सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी सोबतच्या परिशिष्ट "क" मध्ये देण्यात आली आहे.)

(१४) जिल्हा संघटनेने आयोजित केलेल्या जिल्हास्तरिय क्रीडा स्पर्धामध्ये सांघिक क्रीडा प्रकारामध्ये कमीत कमी ८ संघ वैयक्तिक क्रीडा प्रकारामध्ये प्रत्येक बाबीत कमीत कमी ८ खेळाडू सहभागी होणे आवश्यक आहे. तसेच सहभागी झालेल्या खेळाडूंची नोंदणी जिल्हा स्तरावर होणे आवश्यक आहे. सदर नियम राज्यस्तर स्पर्धेसाठीही लागू करण्यात यावा.

(१५) राज्य संघटनांनी जिल्हा, विभाग व राज्यस्तर स्पर्धांचे प्रमाणपत्र वाटप करताना प्रमाणपत्रांची रजिस्टरमध्ये नोंद करणे आवश्यक आहे.

(१६) राज्य संघटनांनी स्पर्धेच्या प्रत्येक प्रमाणपत्रावर अनुक्रमांक, संघटनेचा नोंदणी क्रमांक, दिनांक, राज्यस्तरीय कितवी स्पर्धा आहे, स्पर्धेचा कालावधी, स्थळ याचा उल्लेख असणे आवश्यक आहे. तसेच प्रमाणपत्रामध्ये खेळाडूंचे वयोगटाचा उल्लेख आवश्यक आहे.

(१७) प्रत्येक वर्षी एक वयोगटातील एकच स्पर्धा ग्राह्य धरण्यात येईल. निमंत्रित क्रीडा स्पर्धा ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(१८) राज्य व राष्ट्रीयस्तरावरील स्पर्धांच्या प्रमाणपत्रावर अध्यक्ष व सचिव यांच्यापैकी एकाची शाईची स्वाक्षरी अनिवार्य आहे

(१९) राज्य संघटनांनी ज्या जिल्हामध्ये जिल्हा, विभाग व राज्य स्तरावरील स्पर्धांचे आयोजन केले असेल त्या स्पर्धांसाठी संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना व राष्ट्रीयस्पर्धेसाठी संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांना निरिक्षक म्हणून उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात यावे.

(२०) जिल्हा, राज्य संघटनांनी जिल्हास्तरीय स्पर्धा, राज्य अजिक्यपद निवड चाचणी स्पर्धा, राष्ट्रीय स्पर्धा इ. सर्व स्पर्धांचा वार्षिक कार्यक्रम निश्चित करुन त्याची प्रत संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी, विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक संचालनालयास वर्षाच्या सुरुवातीला कळवावी.